**प्रस्तावना :- घनकचरा प्रकल्प अहवालानुसार ३ युनिट डंपर टिपर उपलब्ध होणेकरिता प्राप्त झालेल्या निविदाकार व निविदाकारांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.**

घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार ३ युनिट डंपर टिपर घेणेसाठी केद्र शासनाच्या जीईएम पोर्टलवर फेर-१ मध्ये दि.२७/०१/२०२३ ते दि.३/०२/२०२३ याकालावधीत प्रसिद्ध करण्यात आली असता सदर निविदे करिता २ निविदाकार प्राप्त झाले होते.

प्राप्त २ निविदाकार यांनी निविदेच्या अटी-शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता मा. निविदा समिती समक्ष करण्यात आली असता पात्र २ निविदाकार यांचे आर्थिक बोलींचा (लिफाफा क्र.२) लिफाफा खुले करण्यात आले असता खालील प्रमाणे त्यांनी एकुण खर्च सादर केले आहे.

| कामाचा तपशील | ALFLAH MANUFACTURING, RAJASTAN | COMPANY U S ENTERPRISES |
|---|---|---|
| घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार ३ युनिट जीईएम पोर्टलच्या स्पेसिफिकेशन नुसार डंपर टिपर उपलब्ध करुन घेणे बाबत. | ३ युनिट डंपर टिपर करिता एकुण खर्च रु.४४,०९,३५८/- | ३ युनिट डंपर टिपर करिता एकुण खर्च रु.४६,२७,२००/- |

वरील तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार ३ युनिट जीईएम पोर्टलच्या स्पेसिफिकेशन नुसार डंपर टिपर उपलब्ध करुन देणे करिता जीईएम पोर्टलवर मे.ALFLAH MANUFACTURING,RAJASTAN यांनी रु.४४,०९,३५८/- इतका खर्च सादर केला आहे.

घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार ३ युनिट जीईएम पोर्टलच्या स्पेसिफिकेशन नुसार डंपर टिपर उपलब्ध करुन घेणे करिता रु.४६,५०,०००/- इतक्या खर्चास मान्यता प्राप्त असुन जीईएम पोर्टलवरील प्राप्त खर्चा नुसार रु.४४,०९,३५८/- असे प्राप्त झाले असल्याने मे.ALFLAH MANUFACTURING,RAJASTAN यांनी याकामा करिता रु.२,४०,६४२/- इतकी रक्कम कमी केली असता मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.२३/०२/२०२३ रोजी मान्यता दिली आहे.

सबब घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार ३ युनिट जीईएम पोर्टलच्या स्पेसिफिकेशन नुसार डंपर टिपर उपलब्ध करुन घेणे करिता मे.ALFLAH MANUFACTURING,RAJASTAN यांनी रु.४४,०९,३५८/- असे सादर केले असुन सद्यास्थिती सादर केलेल्या निविदाकारास व खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी ही विनंती.

प्रशासकिय ठराव क्र. १०४

दि. ०६ / 03 /२०२३

घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार ३ युनिट जीईएम पोर्टलच्या स्पेसिफिकेशन नुसार डंपर टिपर उपलब्ध करुन घेणे करिता मे.ALFLAH MANUFACTURING,RAJASTAN यांनी रु.४४,०९,३५८/- असे सादर केले असुन प्राप्त झालेले पुरवठाधारक व त्यांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत विनंती आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१(भाग२)/नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार (महासभा व स्थायी समितीचे अधिकार) मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार ३ युनिट जीईएम पोर्टलच्या स्पेसिफिकेशन प्रमाणे जीईएम पोर्टलवर प्राप्त झालेले मे.ALFLAH MANUFACTURING,RAJASTAN यांनी ३ युनिट डंपर टिपर उपलब्ध करुन देणेसाठी एकुण रु.४४,०९,३५८/- असे सादर केलेले असल्याने निविदाकारास व दरांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

**प्रस्तावना :-**

**विषय :- मनपाच्या वॉर्ड क्र. १६ फुलेनगर नं. ०२ येथील मुख्य रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या **मनपाच्या वॉर्ड क्र. १६ फुलेनगर नं. ०२ येथील मुख्य रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५९,२८,६१५/-) या कामाची बी-१ प्रकारची निविदा मागविण्यात आली होती. सदर कामाची निविदा सुचना क्रं. १४१/२०२२-२३ (ऑनलाईन टेंडर क्र. ८४५०५१) वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या w.w.w.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन सदर कामासाठी ई-निविदा मागविणेत आल्या आहेत. सदर कामासाठी एकुण पात्र ०६ निविदा पैकी **मे. पायोनिर वॉटरप्रुफ कोटींग, ठाणे.** यांनी दिलेला देकार न्युनतम असुन त्यानुसार कामाची रक्कम रु. ४९,०८,८९३/- ( **GST** सह) येत आहे.

सदर कामाकरीता PWD SSR (civil) २०२०-२१ चे दर घेवुन रक्कम रुपये ५९,२८,६१५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्राप्त न्युनतम दराची निविदा अंदाजपत्रकाशी तुलना केली असता **मे. पायोनिर वॉटरप्रुफ कोटींग, ठाणे.** यांची प्राकलन दरावर अंदाजपत्रक दराची निविदा न्युनतम आहे. त्यानुसार येणा-या रक्कम रु. ४९,०८,८९३/- (अक्षरी रु. एकोणपन्नास लाख आठ हजार आठशे त्र्यान्नव रुपये मात्र) (GST सह) च्या खर्चास व सदरचे काम **मे. पायोनिर वॉटरप्रुफ कोटींग, ठाणे.** यांचेकडुन करुन घेणेस वित्तीय मंजुरी देणेच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक ०९/०२/२०२३ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे. त्यास मान्यता देणेचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासक मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :** 905 **दिनांक :-** 06/03/२०२२

**मनपाच्या वॉर्ड क्र. १६ फुलेनगर नं. ०२ येथील मुख्य रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.** कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. पायोनिर वॉटरप्रुफ कोटींग, ठाणे.** यांची प्राकलन दरावर अंदाजपत्रक दराची निविदा न्युनतम म्हणजेच रक्कम रु. ४९,०८,८९३/- (अक्षरी रु. एकोणपन्नास लाख आठ हजार आठशे त्र्यान्नव रुपये मात्र)(**GST** सह) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता,मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखा व वित्त अधिकरी व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष:त कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, **मनपाच्या वॉर्ड क्र. १६ फुलेनगर नं. ०२ येथील मुख्य रस्ता कॉंक्रिटीकरण करणे** कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. पायोनिर वॉटरप्रुफ कोटींग, ठाणे.** यांचे बरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका